स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 09—12—2011 रोजी दुपारी 12—30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 10. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 11. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 12. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 13. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 14. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 15. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 147 :–** वॉर्ड क्र. 52, भानखेडा मुस्लीम कब्रस्थान येथे विविध विकास कामे करण्यास्तव प्राप्त दोन निविदांपैकी मे. आर.एस. नायडू, यांनी प्राकलनीय दरापेक्षा 1.51 टक्के कमी दराची रु. 47,52,303/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 148 :–** वॉर्ड क्र. 127, बिडीपेठ येथील देवतरवार गुरुजी ते शहेनशाह चौक दरम्यान आर.सी.सी. ड्रेन व फुटपाथसह रस्त्यांचे उर्वरीत बांधकामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. एस.के. गुरुबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 0.10 टक्के कमी दराची रु. 32,63,733/– राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 149 :–** नागपूर शहराच्या पिण्याकरीता, पेंच जलाशयात असलेल्या 112 दलघमी (112 Mm3) पाण्याच्या आरक्षणाच्या करारनाम्याची मुदत दि. 30.11.2011 रोजी संपुष्टात आल्याने व दंडणीय आकारणी लागु होऊ नये याकरिता करारनात्याचे नूतनीकरण आवश्यक असल्याने पुढील सहा वर्षाच्या नूतनीकरणाकरिता निर्धारित सुरक्षा ठेव रक्कम रु. 1,01,26,530/– शासनाच्या जलसंपदा विभागाकडे म.न.पा. तर्फे दि. 30.11.2011 रोजी जमा करण्यात आली. करिता या भुगतानास कार्योत्तर मंजुरी देऊन केलेली कारवाई नियमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 150 :–** डॉ. हेडगेवार चौक, वर्धा रोड येथील सौदर्याकरणाकरीता विविध कामाच्या रुपये 25,60,550/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करुन कामनिहाय निविदा मागविणे तसेच या कामाकरीता वास्तूविशारद मे.आर.डी. आर्कीटेक्ट ॲड कंसलटंट यांची म.न.पा.चे निर्धारित दरानूसार वास्तूविषयक सेवा घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 151 :–** नागपूर शहरात उघडयावर शौचास जाणाऱ्या लोकांना समस्येतुन मुक्त करण्यासाठी तसेच जुन्या मोडकळीस आलेल्या शौचालयाचे नवनिर्माण आणि शहरातील सार्वजनिक स्थळे, बाजारपेठ इत्यादी ठिकाणी येणाऱ्या तरंगत्या लोकांसाठी सार्वजनिक शौचालये बांधण्याच्या कामाकरिता एकुण रु. 41.00 कोटीचा प्रस्ताव असुन या कामाचा खर्च सन 2011–12 मध्ये रु. 11.00 कोटी, सन 2012–13 मध्ये रु. 15.00 कोटी आणि 2013–14 मध्ये रु. 15.00 कोटी अशा तीन चरणात करण्याचा प्रस्ताव असुन यापैकी प्रथम चरणात नागपूर महानगरपालिकेद्वारा सन 2011–12, मध्ये म.न.पा.च्या 10 झोन क्षेत्रातील एकुण 651 सीट्स करिता सुलभ शौचालयाच्या धर्तीवर "पैसे द्या व वापरा" या तत्वावर शासन धोरणानुसार समाजसेवजी संस्थाकडुन बांधुन घेवुन 30 वर्षे देखभाल करण्याचा व चालविण्याच्या अटी–शर्तीवर शौचालयाचे 88 युनिट्स निर्माण करण्याकरिता रु. 11.01 कोटीचा प्रस्ताव व उपरोक्त प्रमाणे एकुण 41 कोटीचा प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 152 :</u>– नागपूर शहरात टॅकरद्वारे पिण्याचे पाण्याचा पूरवठा व वितरण करण्याकरीता प्रति फेरी दर निश्चित करण्याकरीता ई–निविदेद्वारे प्राप्त झालेल्या दरासंबंधात खालील नमूद प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन वेळोवेळी प्रशासनाद्वारे नागपूर शहरात जो पाणीपुरवठा होणार आहे. ते काम प्रत्येक टॅकरला समान फेऱ्या देऊन समप्रमाणात वाटुन देण्यात यावे या अटीसह 1 व 2 व 3 समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. वर्ष 2011–12 करीता टॅकर क्षमतेनुसार खालील दरांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | 2000 लीटर | – | रु. 290/– प्रति फेरी |
| ब. | 3000 लीटर | – | रु. 316/– प्रति फेरी |
| क. | 4000 लीटर | – | रु. 340/– प्रति फेरी |
| ड. | 6000 लीटर | – | रु. 371/– प्रति फेरी |

2. वर्ष 2012–13 करीता टॅकर क्षमतेनुसार खालील दरांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | 2000 लीटर | – | रु. 319/– प्रति फेरी |
| ब. | 3000 लीटर | – | रु. 348/– प्रति फेरी |
| क. | 4000 लीटर | – | रु. 374/– प्रति फेरी |
| ड. | 6000 लीटर | – | रु. 408/– प्रति फेरी |

3. वरील दरांनुसार इच्छुक निविदाकाराकडून अंदाजपत्रकातील उपलब्ध प्रावधान रक्कमेपर्यंत काम करवून घेण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 153 :</u>– महिला व बाल कल्याण समिती द्वारे सन 2011–12 या आर्थिक वर्षामध्ये अल्प उत्पन्न गटातील महिला व मुलींना विविध व्यवसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देण्याकरिता मिटकॉन कन्सल्टन्सी ॲन्ड इंजिनिअरिंग सर्विसेस यांना झोन क्र. 1 ते 5, व ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हरमेन्ट यांना झोन क्र. 6 ते 10 करीता 136 वार्ड व 5 नामनिदेर्शित सदस्य असे एकूण 141 वार्डाकरीता, प्रती वार्ड 18 प्रशिक्षणार्थि याप्रमाणे एकूण 2538 प्रशिक्षणार्थ्यांना एकूण रु. 45,68,400/– इतका खर्चास चालू आर्थिक वर्षात जून्या आर्थिक वर्षाप्रमाणे पूर्नप्रत्ययी आदेश मंजूर असलेल्या अटी व शर्तीवर असलेल्या प्रशिक्षण देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन "मिटकॉन कन्सल्टन्सी ॲन्ड इंजिनिअरींग सर्विसेस यांना 4 झोन, "ऑल इंडीया लोकल सेल्फ गव्हरमेंट" यांना 4 झोन व उर्वरीत 2 झोन चे काम शहरातील महीला बचत गटांना देण्याच्या अटीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 154** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर